# ५० हजार विद्यार्थी देणार ऑनलाईन परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा शनिवार (१७) पासून सुरु होत आहेत. यासाठी सुमारे ५० हजार ६२६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर १२ हजार ५६५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. अद्यापही १० हजार ८०९ विद्यार्थ्यांनी कोणताच पर्याय निवडला नसल्याने या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या सुचनेनुसार परीक्षा द्याव्या लागणार आहेत.

१७ पासून अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरु होत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी संकेतस्थळावर ऑप्शन फॉर्म भरणे बंधनकारक होते. १२ रोजी सायंकाळी ५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. ७४ हजार १७ विद्यार्थ्यांपैकी ६३ हजार १९१ विद्यार्थ्यांनी ऑप्शन फॉर्म भरला आहे. यामध्ये ५० हजार ६२६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईनसाठी तर १२ हजार ५६५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेसाठी पसंती दर्शविली आहे.



**मॉकटेस्ट आजपासून शक्य**

ऑनलाईन परीक्षेसाठी आवश्यक असणारे सॉफ्टवेअरचे काम पुर्ण झाले आहे. याचे प्रशिक्षण देण्याचे काम कंपनीच्या वतीने सुरु करण्यात आले आहे. यामुळे सराव प्रश्न आजपासून संकेतस्थळावर उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

# ऑनलाईन परीक्षेला विद्यार्थ्यांची पसंती

## अंतिम वर्ष : ५० हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा शनिवार (ता. १७) पासून सुरू होत आहेत. यासाठी ५० हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. १२,५०० विद्यार्थ्यांनी ऑफलाईनचा पर्याय निवडला असून १०,८०० विद्यार्थ्यांनी नोंदणीच केलेली नाही. आज नोंदणी करण्याचा शेवटचा दिवस होता.

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सरकारने सर्वच परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने याला आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेऊनच विद्यार्थ्यांना गुणपत्रक द्यावे असा निर्णय दिला तसेच १० नोव्हेंबरपर्यंत परीक्षा होऊन निकास जाहीर करण्याचे आदेशात नमूद केले. त्यामुळे विद्यापीठांना परीक्षा घेण्याचे नियोजन करावे लागले. यातील पहिल्या, दुसऱ्या वर्षाच्या आणि बॅकलॉगच्या परीक्षा महाविद्यालयांच्या स्तरावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अंतिम



वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाने घेण्याचे निश्चित केले. या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने घेण्याचे ठरले. यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन किंवा ऑफलाईनचा पर्याय निवडायचा होता.

यासाठी आजचा (ता. १२) शेटवचा दिवस होता. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५० हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईनचा तर १२,५०० विद्यार्थी ऑफलाईन परीक्षा देणार आहेत. १०,८०० विद्यार्थ्यांनी कोणताच पर्याय निवडला नसल्याने त्यांनी आपल्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्या अधिविभागात जाऊन ऑफलाईन पद्धतीने परीक्षा द्यावयाची आहे.

# डॉ. शिर्के यांची निवड हा जिल्ह्याचा अभिमान

कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून अनेक ज्ञानी लोक कुलगुरू म्हणून लाभले. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार, त्यानंतरचे कुलगुरू बॅ. पी. जी. पाटील यांनी कर्मवीरअण्णांचा वारसा पुढे चालू ठेवला. आज विद्यापीठाचे १३ वे कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांची झालेली निवड कोल्हापूर जिल्हावासीयांना अभिमानास्पद आहे. कारण ते याच जिल्ह्यातील असून, त्यांनी आपली हयात शिवाजी विद्यापीठाच्या सेवेतच घालविली. त्यांना या विद्यापीठाचा लौकिक वाढविण्याची संधी मिळाली हा त्यांच्या कार्याचा गौरव म्हणावा लागेल.

– रावसाहेब शिरोळे, रुकडी (जि. कोल्हापूर)

# अंतिम वर्ष परीक्षा मॉक टेस्टची तयारी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षेसाठी मॉक टेस्ट घेण्याचे नियोजन सुरू झाले आहे. अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. १३९ अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ७४ हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षेची तयारी परीक्षा विभागाकडून वेगाने सुरू आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यासंदर्भात सॉफ्टवेअरमधून कामकाज सुरू झाले आहे. विद्यार्थ्यांची जनरल मॉक टेस्ट घेण्याबाबतचा निर्णय लवकरच होणार आहे.

# विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करणार : कुलगुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करण्याची आपली भूमिका आहे, असे प्रतिपादन नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी युनिव्हर्सिटी स्टॅटीस्टिक्स टिचर्स असोसिएशनच्या वतीने (सुस्ता) शिर्के यांचा सत्कार करण्यात आला. 'सुस्ता'च्या अध्यक्ष व शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. एच. व्ही. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होत्या. विद्यापीठाचे माजी संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख व 'सुस्ता'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. आर. एन. रत्तीहल्ली यांच्या हस्ते डॉ. शिर्के व प्रा. सौ. सुनीता शिर्के यांचा सत्कार झाला. सत्काराला उत्तर देताना डॉ. शिर्के यांनी सर्व गुरुजनांबद्दल ऋण व्यक्त केले. सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. व्ही. बी. घुटे यांनी पत्राद्वारे व प्राचार्य बी. जी. कोरे, प्राचार्य एम. के. पाटील, डॉ. डी. एम. सकटे यांनी ऑनलाईन मनोगत व्यक्त केले. संघटना सचिव डॉ. पी. वाय. पाटील यांनी स्वागत केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. जे. व्ही. देशपांडे, शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख व भारती विद्यापीठाचे (पुणे) माजी संचालक प्रा. एम. एस. प्रसाद आदी उपस्थित होते.